## जाहीर प्रकटन

सन २०२२ या वर्षासाठी दिवाळी सणानिमित्त पुणे महानगरपालिका नियोजित फटाका स्टॉल विक्रीसाठी पुणे महानगरपालिके तर्फे खालील जागा निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अक्र | अर्ज स्विकृती क्षेत्रिय कार्यालयाचे नाव (एक खिडकी) | पुणे मनपा फटाका स्टॉल नियोजित जागा | नियोजित स्टॉल संख्या | निर्धारीत एकवट भाडे रक्कम दि.१५/१०/२२ ते दि. २७/१०/२२ प्रति स्टॉल (अधिक GST लागू) | अनामत रक्कम | सफाई शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय | कोंढवा खुर्द स.नं.४ पार्क आरक्षणापैकी जागा (फायर स्टेशनच्या मागील) | ०९ | ११,०००/- | ३००००/- | १०००/- |
| २. | हडपसर - मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर स.नं. १५७, १५८ १६१ येथिल हायस्कूल आरक्षित जागा सी.टी.एस.१६५६ | २५ | ११,०००/ | ३००००/- | १०००/- |
| ३. | येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रिय कार्यालय | धानोरी स.नं. १६/३ ॲमेनिटी स्पेस जागा | ०५ | ११,०००/ | ३००००/- | १०००/- |
| ४. | कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालय | कोथरूड स.नं.५४/४, ओटा मार्केट आरक्षणापैकी जागा | ०५ | ११,०००/ | ३००००/- | १०००/- |
| ५. | धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | पर्वती स.नं.९३ सह्याद्री मैदान, लक्ष्मीनगर | ०५ | ११,०००/ | ३००००/- | १०००/- |
| ६. | धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | कात्रज स.नं. ७३/७४ प्रायमरी स्कूल आरक्षित २८०० चौ.मी.जागा | २५ | ११,०००/ | ३००००/- | १०००/- |
| ७. | सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय | धायरी स.नं. १४४/४, यशवंत विहार सोसायटी, धायरी, ॲमेनिटी स्पेस ९४५ चौ.मी. | ०५ | ११,०००/ | ३००००/- | १०००/- |
| ८. | येरवडा क्षेत्रिय कार्यालय | कल्याणी नगर फा.प्लॉट नं. ७५ | ०५ | ११,०००/ | ३००००/- | १०००/- |
| ९. | नगर रोड - वडगाव शेरी | लोहगाव स.नं. २०७ फिनिक्स मॉल शेजारील | ०२ | ११,०००/ | ३००००/- | १०००/- |

Scanned with CamScanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्रिय कार्यालय | क्षेत्रिय कार्यालयाची जागा | | | | |
| १० | नगर रोड - वडगाव शेरी क्षेत्रिय कार्यालय | खराडी स.नं. १२ | ४० | ११,०००/ | ३००००/- | १०००/- |
| ११ | औंध - बाणेर क्षेत्रिय कार्यालय | बालेवाडी स.नं. १७ | १० | ११,०००/ | ३००००/- | १०००/- |
| १२ | हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर स.नं. १३७ मोहन धारिया उद्याना समोर, सिज़न मॉल जवळ | ०५ | ११,०००/ | ३००००/- | १०००/- |
| १३ | कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय | शनिवार पेठ, नदीपात्र वर्तक उद्यानालगत १००' फुटी रोड | ३५ | २३,५९५/- **(दि.११/१०/२२ ते दि. २७/१०/२२)** | ५००००/- | १०००/- |

तरी उपरोक्त ठिकाणी स्टॉलकरीता जाहीररित्या अर्ज मागवून अग्रक्रमाने येणाऱ्यास प्राधान्य अशा पद्धतीने व निश्चित केलेल्या स्टॉल संख्येपेक्षा जास्त अर्जदारांची मागणी आल्यास त्या ठिकाणांच्या स्टॉलसाठी लिलाव प्रक्रिया राबविण्यात येईल. त्यानुसार वरील जागांकरीता मागणी अर्ज (अर्जदाराचे नाव, पत्ता, पॅन कार्ड, आधार कार्ड, संपर्क क्र. प्रस्तावित भाडे रक्कम इ. बाबी नमुद करून) शुक्रवार दि.०७/१०/२०२२ अखेर कार्यालयीन वेळेत दु. १२.०० वाजेपर्यंत संबंधीत क्षेत्रिय कार्यालयाकडील एक खिडकी कक्ष स्थापन केला असून सदर ठिकाणी अर्ज अनामत रकमेसह दाखल करावेत. सदर अनामत भरलेली पावती असल्याशिवाय अर्जदारास लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. ज्या ठिकाणी निश्चित स्टॉलपेक्षा जादा मागणी अर्ज असतील त्या ठिकाणची लिलाव प्रक्रिया शुक्रवार दि.०७/१०/२०२२ रोजी दुपारी ०३.३० वा. छत्रपती शिवाजी महाराज सभागृह (जुना जी.बी. हॉल), तिसरा मजला, पुणे म.न.पा. शिवाजीनगर, पुणे ०५ येथे घेण्यात येईल. स्टॉलधारकांनी खालील अटींचे पालन करावे. (**वर्तकबाग येथील स्टॉलधारकांनी अनामत रक्कम व अर्ज मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे दि. ०७/१०/२०२२ रोजी दु. १.०० वाजेपर्य सादर करावेत.**)

**अटी :-**

१. अर्ज स्विकृती दि. ०७/१०/२०२२ अखेर दु. १२.०० पर्यंत राहील.

२. फॉर्म स्विकृती वेळी स्टॉलधारकाने अनामत रक्कम भरल्याशिवाय लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. अनामत रक्कमेची पावतीशिवाय सभागृहामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. तसेच बोलीची रक्कम (स्टॉलचे भाडे + GST + सफाई शुल्क) दि.१०/१०/२०२२ अखेर मनपा कोषागारात भरणे अन्यथा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

३. प्रत्येक स्टॉलधारकाने अग्निशमन व्यवस्था/उपकरणे स्टॉलमध्ये स्वखर्चाने बसविणे बंधनकारक राहील. १० स्टॉलपेक्षा जास्त स्टॉल असलेल्या ठिकाणी स्टॉलधाराकाने स्वखर्चाने अग्निशमन वाहनाची व्यवस्था करणे आवश्यक राहील.

४. उपरोक्त यादीमधील जागेमध्ये स्टॉल संख्येप्रमाणे १० संख्या स्टॉलचे वरील स्टॉलसाठी प्रति ठिकाण १ यानुसार रूग्णवाहिकेची व्यवस्था स्टॉलधारकाने स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

५. ज्या ठिकाणी स्टॉलची संख्या १० पेक्षा कमी आहे अशा ठिकाणी अपघात घडल्यास पुणे महानगरपालिकेचा दूरध्वनी क्र. ०२० २५५०६३०० व ०२० ०६०५३५३२ किंवा मा. शासनाच्या १०८ क्रमांकाच्या रूग्णवाहिकेस संपर्क साधणेची जबाबदारी स्टॉलधारकाची राहील.

६. अर्जदार यांनी अर्जासोबत मान्य मोजमापापेक्षा जादा जागेचा वापर करणार नाही व नैसर्गिक आपत्ती (नदीपात्रात पूर आल्यास) व काही अपघात घडल्यास त्याची तोषिस महानगरपालिकेस लागू देणार नाही. अशा आशयाचे विहित नमुन्यातील हमीपत्र रक्कम रू. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर एक खिडकी कक्षाकडे (वर्तक बागेसाठी मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडे) सादर करणे आवश्यक आहे.

७. कोवीड-१९ चे अनुषंगाने मा. शासनाकडून निर्गमित करण्यात आलेले आदेश स्टॉलधारकांवर बंधनकारक राहतील.

८. स्टॉलचे आकारमान १०' x १५' असून प्रत्येक स्टॉलमध्ये १० फुट चे अंतर सोडणे बंधनकारक आहे. स्टॉलधारकाने १ फुट जरी जागेचा जास्त वापर केल्यास अनामत रक्कम जप्त केली जाईल.

९. स्टॉलधारकाने पार्किंगची व्यवस्था पुणे महानगरपालिकेने निश्चित केलेल्या जागी ग्राहकाकडून स्टॉलधारकाने करणे बंधनकारक आहे.

१०. फटाका स्टॉलधारकाने अग्निशमन विभाग व पोलीस विभाग यांचे वैयक्तिक परवाने घेणे बंधनकारक राहील.

११. निश्चित केलेल्या जागेस अग्निशमन विभाग व इतर शासकीय विभागाची हरकत असल्यास सदर जागा रद्द करण्याचे अधिकार मालमत्ता व व्यवस्थापन विभागास राहतील व त्या ठिकाणी फटाका स्टॉलकरीता जागा उपलब्ध करून दिली जाणार नाही.

१२. स्टॉलधारकाने ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण होणेसाठी स्टॉलच्या (मांडवाच्या) वरील बाजूस ३ फुटापेक्षा जास्त झाप (वेदर शेड) टाकू नये.

१३. उपरोक्त अटींचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास स्टॉलधारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

(राजेंद्र मुठे)
**उप आयुक्त**
मालमत्ता व व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

Scanned with CamScanner